पोलीस उप महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध विभाग, पुणे या पदाची विशेष पोलीस महासंचालक (महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे नियंत्रण विभाग) या पदावर श्रेणी उन्नत करणेबाबत ....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१५/प्र.क्र.११९/ विशा- ३ अ
गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक :- ५ जानेवारी, २०१६

वाचा

१) शासन निर्णय, गृह विभाग, मंत्रालय, क्रमांक पी.पी.ए-१३९४/५/पोल-८, दि. २९.०९.१९९५
२) शासन निर्णय, गृह विभाग, मंत्रालय, क्रमांक पी.पी.ए-१३९४/५/पोल-८, दि. ०७.१२.१९९५
३) शासन निर्णय, गृह विभाग, मंत्रालय, क्रमांक पी.पी.ए-१३९४/५/ (भाग-४)पोल-८, दि. १५.०५.२००२
४) शासन आदेश,गृह विभाग,मंत्रलाय, क्र.आयपीएस-१२०६/प्र.क्र.२६०/पोल-१, दि. १४.०६.२००७
५) शासन निर्णय, गृह विभाग, मंत्रालय, क्रमांक पीसीआर ०८१०/ प्र.क्र. ७५२/ विशा ६, दि. ०५.०५.२०१०
६) शासन निर्णय,गृह विभाग,मंत्रालय, क्र.आयपीएस-०३१५/प्र.क्र.७८ (३)/पोल-१, दि. ०५.०५.२०१५
७) शासन आदेश,गृह विभाग,मंत्रालय, क्र.आयपीएस-०३१५/प्र.क्र.७८ (३)/भाग-२/पोल-१, दि. २०.१०.२०१५
८) शासन आदेश,गृह विभाग,मंत्रालय, क्रमांक संकिर्ण २०१४/प्र.क.३०/विशा ३ (अ), दि. ०७.०३.२०१५
९) शासन निर्णय, वित्त विभाग, मंत्रालय, क्रमांक संकिर्ण २०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि. ०२.०६.२०१५

प्रस्तावना

राज्यातील महिलांवर होणा-या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच बाल वेश्या प्रतिबंधक कायदा व अनैतिक व्यवसाय प्रतिबंधक कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरावर पोलीस उप महानिरीक्षक यांचे नियंत्रणाखाली महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष एकूण १० पदांसह उपरोक्त क्र.१ येथील दिनांक २९.९.१९९५ अन्वये निर्माण करण्यात आला आहे. तदनंतर उपरोक्त क्र. २ येथील शासन निर्णय दिनांक ७.१२.१९९५ अन्वये या कक्षाचे मुख्यालय मुंबई येथून नागपूर येथे हलविण्यात आले होते. तदनंतर उपरोक्त क्र. ३ येथील शासन निर्णय दिनांक १५ मे, २००२ अन्वये सदर कक्षाचे मुख्यालय पुन्हा नागपूरहून मुंबई येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच उपरोक्त क्र.४ येथील दिनांक १४.०६.२००७ अन्वये पोलीस उप महानिरीक्षक ,महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, या पदाची श्रेणीवाढ करून ते विशेष पोलीस महानिरीक्षक या दर्जाचे करण्यात आले आहे. तदनंतर उपरोक्त

क्र.६ येथील शासन निर्णय दिनांक ५.१०.२०१० अन्वये या कक्षाचे मुख्यालय पुन्हा मुंबई येथून पुणे येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच उपरोक्त क्र.६ येथील शासन निर्णय दिनांक ५.५.२०१५ अन्वये पोलीस उप महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध विभाग, पुणे या पदाची अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या पदामध्ये श्रेणीवाढ करण्यात आली होती. तदनंतर उपरोक्त क्र. ७ येथील शासन निर्णय दिनांक २०.१०.२०१५ अन्वये अप्पर पोलीस महासंचालक, महिला अत्याचार प्रतिबंध विभाग, पुणे हे पद पुर्ववत "पोलीस उप महानिरीक्षक" दर्जाच्या पदामध्ये श्रेणी अवनत करण्यात आले होते.

२. राज्यात वाढत असलेल्या सायबर गुन्हयांवर प्रभावीपणे आळा घालण्याकरीता व राज्यातील सर्व सायबर क्राईम गुन्हे इन्व्हेस्टीगेशन सेल मध्ये समन्वय साधण्यासाठी सायबर क्राईम सेल, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना State Nodal Agency म्हणून उपरोक्त क्र. ८ येथील शासन निर्णय दिनांक ७.३.२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली होती. राज्य शासन आणि पोलीस यंत्रणेमध्ये सायबर गुन्हयांच्या संदर्भात अधिक परिणामकारक सूसूत्रता आणण्याकरीता आणि सायबर गुन्हयांच्या शोध घेण्यामध्ये कायमस्वरुपी समन्वय करण्यासाठी राज्य स्तरावर मुंबई येथे एक सायबर कक्ष निर्माण करणे आवश्यक आहे.

३. त्याकरीता राज्यातील सायबर गुन्हे व महिला अत्याचाराशी संबंधीत गुन्हे यांचे एकत्रित समन्वय करण्यासाठी राज्यस्तरावर विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या पदावरील अधिका-याची नियुक्ती करण्याचे तसेच त्याकरीता अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले पोलीस उप महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध विभाग, पुणे हे पद पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्याचे तसेच, या पदाची श्रेणी उन्नत करुन त्याचे पदनाम विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे) असे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>

१. पोलीस उप महानिरीक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध विभाग) या पदाची श्रेणी वाढ करण्यात येत असून या पदाचे पद नाम विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे) असे राहील.

२. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या अधिपत्या खाली कार्यरत असलेले पोलीस उप महानिरीक्षक महिला (अत्याचार प्रतिबंध विभाग) हे पद पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात येत आहे.

३. महिला अत्याचार प्रतिबंध विभागाचे पुणे येथील कार्यालय तेथील मंजूर पदांसह (वाचा उपरोक्त क्र.१ येथील शासन निर्णय अन्वये मंजूर करण्यात आलेली पदे) मुंबई येथे स्थलांतरीत करण्यात येत आहे. हे कार्यालय विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे) यांचे नियंत्रणाखाली कार्यरत राहील.

४. विशेष पोलीस महानिरीक्षक (नागरी हक्क संरक्षण) या पदाची श्रेणी अवनत करण्यात येत असून त्याचे पदनाम यापुढे पोलीस उप महानिरीक्षक (नागरी हक्क संरक्षण) असे राहील.

५. उपरोक्त क्र. ९ येथील शासन निर्णय, दिनांक ७ मार्च, २०१५ हा या शासन निर्णयाव्दारे अधिक्रमीत करण्यात येत असून, या निर्णयान्वये State Nodal Agency म्हणून सायबर क्राईम सेल, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आलेली कार्ये आता विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे यांचेकडे सोपविण्यात येत आहेत. ही कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

५.१) सांख्यिकी :-

५.१.१) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० अन्वये व इतर कायद्यान्वये दाखल झालेले गुन्हे ज्यात माहिती तंत्रज्ञान कायद्याची कलमे लावण्यात आलेली असतील अशा गुन्ह्यांची माहिती संकलीत करणे.

५.१.२) उघडकीस आलेल्या गुन्ह्यांची माहिती, आरोपींची माहिती संकलीत करणे.

५.१.३) न्यायालयात शाबित झालेल्या गुन्ह्यांची माहिती व न्यायालयाचे निकालपत्रे संकलीत करणे, त्यांचा अभ्यास करणे.

५.१.४) गुन्हे करण्याच्या पध्दतीचा अभ्यास करून गुन्हे कार्यप्रणाली (Modus Operandi) शोधणे.

५.१.५) आवश्यकतेनुसार या संदर्भात इतर माहिती गोळा करणे व त्याचे पृथःकरण करणे.

५.१.६) माहिती तंत्रज्ञान कायद्याखाली गुन्ह्यांचे संदर्भातल्या राज्यातल्या व केंद्रिय पातळीवरील परिषदांमध्ये राज्य पोलीस दलाचे प्रतिनिधीत्व करणे.

५.२) गुन्ह्यांचा तपासः-

५.२.१) ज्या संवेदनशील व महत्त्वाच्या प्रकरणांचा तपास करण्याबाबत आदेश झाले असतील अशा गुन्ह्यांचा तपास करणे.

५.२.२) राज्यातील इतर सायबर क्राईम इन्व्हेस्टिगेशन सेल मधील तपासी अंमलदार यांना त्यांचेकडील गुन्हे तपासात मार्गदर्शन व तांत्रिक मदत करणे.

५.२.३) सायबर गुन्ह्यांचे तपासाकरीता मोबाईल कंपन्या, आयटी कंपन्या व इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर यांचेशी संपर्क साधून त्यांचेकडून गुन्ह्याचे तपासासंदर्भात कोणतीही आवश्यक माहिती मागविण्याचे अधिकार असतील.

५.२.४) इतर राज्यातील व केंद्र शासनाच्या तपास यंत्रणांबरोबर समन्वय साधणे.

५.३) प्रशिक्षणः-

५.३.१) राज्यातील अधिकारी व कर्मचा-यांना प्रशिक्षित करून मनुष्यबळ तयार करणे.

५.३.२) इतर प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणाबाबत समन्वय ठेवणे. माहितीची देवाणघेवाण करणे व उपयुक्त प्रशिक्षण राज्यातील अधिकारी / कर्मचा-यांना उपलब्ध करून देणेकरीता प्रयत्न करणे.

५.३.३) निर्माण होणा-या नवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती संकलीत करणे. त्याबाबत तज्ञांशी संपर्क ठेवणे. तज्ञांच्या सहाय्याने ते तंत्रज्ञान प्रशिक्षणात समाविष्ट करून प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम अद्यावत ठेवणे. सी-डॅक, पुणे मिटकॅान, पुणे, सीबीआय ॲकेडमी, ग़ाझीयाबाद व केंद्र शासनाच्या सीडीटीएस या संगणक क्षेत्रातील अद्यावत प्रशिक्षण देणा-या संस्थांशी समन्वय ठेवणे.

५.३.४) क्रिमिनल जस्टिस सिस्टिम मधील इतर अधिकारी व कर्मचारी यांना संगणक गुन्ह्याचे तपास व पुराव्याबाबत प्रशिक्षण देणे.

५.३.५) सॉफ्टवेअर, फिल्म व म्युझिक कंपन्यांशी संबंधीत तज्ञ व्यक्ती व संस्था यांच्या सहकार्याने सायबर/ कॅाम्प्युटर, पायरसी गुन्ह्यांबाबत परिसंवाद, संमेलने व कार्यशाळा आयोजित करणे.

५.३.६) सायबर क्षेत्रात काम करणा-या NASSCOM, DSCI, फॉरेन्सिक लॅब, कलिना, मुंबई यांना भेटी आयोजित करून सायबर गुन्ह्यांच्या सखोल तपासाबाबत माहिती उपलब्ध करून देणे.

६. विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे) हे सायबर गुन्हे या विषयासंबंधात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांना वेळोवेळी प्रतिवेदित करतील.

७. विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे) यांचे कार्य मुल्यांकन अहवाल प्रतिवेदन प्राधिकारी म्हणून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे प्रतिवेदीत करतील अपर मुख्य सचिव (गृह) हे पुनर्विलोकीत करतील मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे स्विकृती प्राधिकारी म्हणून राहतील.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि. ०२.०६.२०१५ मधील परिच्छेद ४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९ उपरोक्त आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५१७२०२८७०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Dagadu Khedekar

Digitally signed by Sanjay Dagadu Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sanjay Dagadu Khedekar
Date: 2016.01.05 17:49:08 +05'30'

(सं.द.खेडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे) यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (गृह) (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
५) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६) प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक
७) प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
९) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) विशेष पोलीस महानिरीक्षक (नागरी हक्क संरक्षण), मुंबई
१३) पोलीस उप महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध विभाग, पुणे
१४) पोलीस अधीक्षक, सायबर सेल, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) सर्व पोलीस आयुक्त/अधीक्षक, सायबर सेल, गुन्हे अन्वेषण विभाग(ठाणे, मुंबई, नवी मुंबई)
१६) सर्व पोलीस आयुक्त/ जिल्हा पोलीस अधीक्षक
१७) महालेखापाल- १ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८) महालेखापाल- २ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१९) अवर सचिव (पोल १)
२०) निवडनस्ती/गृह विभाग (विशा-३ अ).